

दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

गणपती बाप्पा मोरया

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १५७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.६ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेलमध्ये गणपती बाप्पांचे भक्तीमय वातावरणात विसर्जन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रथम पूजनीय गणपती बाप्पाच्या गणेशोत्सवाला ३१ ऑगस्ट गणेश चतुर्थीपासून सुरुवात झाली असून आज (दि.५ सप्टेंबर) पाच दिवसांच्या बाप्पांचे पनवेलमध्ये विसर्जन पार पडले. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशा जयघोषात, ढोल ताशाच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला. त्याचबरोबरीने रविवारी आगमन झालेल्या जेष्ठांगौरींनाही सोमवारी निरोप देण्यात आला. पनवेल महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, खारघर, पनवेल, तळोजा या चारही प्रभागांमध्ये आयुक्त गणेश देशमुख यांच्या आदेशानुसार विसर्जनाची सोय करण्यात आली होती.

गणेश भक्तांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी महापालिका, पोलीस प्रशासन, अग्निशमन दल, वाहतूक विभाग, सेवाभावी संस्था, समाजसेवक स्वयंसेवक, नगर–





सेवक– नगरसेविका यांच्यासह सर्व प्रशासकीय यंत्रणेने आपली जबाबदारी चोखपणे पार पाडली. विसर्जन घाटावर गणेशमूर्तींची नोंदणी, अनाऊन्समेंट सिस्टीम आदी शिस्तबद्ध उपाययोजना करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे गर्दी टाळण्यासाठी पालिकेच्या कर्मचार्यांच्यावतीने गणेश विसर्जन करण्यात आले.

शहरातील नदीच्या ठिकाणांसह सोसायट्यांच्या आवारात देखील कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली होती. दीड ते दोन फुटांपर्यंतच्या गणेशमूर्त्यांचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्यात आले. दरम्यान पनवेल महापालिका क्षेत्रात हजारो गणेशमुर्त्यांचे विसर्जन करण्यात आले.

विसर्जनासाठी पालिकेच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन स्लॉट्स पद्धतीला गणेशभक्तांकडून उत्तम प्रकारे प्रतिसाद मिळाल्याचे पाहायला मिळाले. ही ऑनलाईन पद्धती राबविण्याचे पालिकेचे हे दुसरे आहे.

गणेशभक्तांना याद्वारे विसर्जन करण्यासाठी टायमिंग स्लॉट्स उपलब्ध करून देण्यात आले होते. त्याप्रमाणे विसर्जनाच्या वेळेनुसार गणेशभक्त नमूद ठिकाणी विसर्जनासाठी उपस्थित राहिले.

आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी पालिकेने गणोत्सवाची जय्यत तयारी केली आहे. गणेशभक्तांच्या सोयी सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग या ७ विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवरती संपूर्ण तयारी करण्यात आली होती.



पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी पोतदार कुटुंबियांच्या निवासस्थानी विराजमान असलेल्या गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासमवेत दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनिल पोतदार, राकेश पितळे, अरविंद पोतदार, कु.आदेश पोतदार

## रोहा : गौरी गणपतींच्या ९०६ बाप्पांसह २७५ गौराईंना भावपुर्ण निरोप!

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यात गौरी गणपतींच्या ९०६ बाप्पांसह आणि २७५ गौराईंचे भावपुर्ण वाता–वरणात विसर्जन करण्यात आले. ढोल ,ताशांच्या आणी टाळ ,मदुंगाच्या गजरात गणेशभक्तांनी पुढच्या वर्षी लवकर या असे म्हणत आपल्या अवडत्या बाप्पाला आणि गौराईंना निरोप दिला. यावेळी शहरातील विसर्जन स्थळांवर गर्दी झाली होती.

गणपती विसर्जनासाठी नगरपालिके तर्फे विसर्जन स्थळांवर सर्वत्र स्वच्छता, मदतीची चोख व्यवस्था, निर्माल्य वाहन आणी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दुपार नंतर वाजत गाजत, फुलांची उधळन, लेझिम ,टाळ मदुंग ,ढोलक, ताशा आणि काही ठिकाणी बेंजोच्या गजरात नृत्य व ताल धरित गणपतीं विसर्जनाच्या दिशेने जात होते, एका मागुन एक



घरगुती गणपती विसर्जनासाठी नदी किनारी निघाले होते. नदीकडे जाणाऱ्या सर्व मार्गांवर आणि विसर्जन स्थळी

.../२

## संक्षिप्त...

### देशाची अर्थव्यवस्था संकटात : आ.जितेंद्र आव्हाड

**दै.रायगड नगरी । मुंबई**

देशात महागाईने उच्चांक गाठला असून सर्वसामान्यांचे जगणे अवघड बनले आहे. तेल, दूध, मीठ, गॅस यांसह जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत मोठी वाढ झाल्याने विरोधकांकडून मोदी सरकावर सातत्याने टिका करण्यात येते. विशेष म्हणजे संसदेच्या पावसाळी अधिवेशनातही राष्ट्रवादीच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी महागाईवरुन केंद्र सरकारला धारेवर धरले होते. आता, राष्ट्रवादीचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देशातील अर्थव्यवस्थेवरुन सरकारवर टिका केली आहे. तसेच, मोदी सरकारचं समर्थन करणाऱ्यांनाही उदाहरण दाखवून दिलंय.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. इंग्लंडचा जीडीपी ३.२ ट्रिलियन आहे. भारताचा ३.५ ट्रिलियन झाला म्हणून नगारे पिटणाऱ्यांनो, त्यांना फक्त ६.८ कोटी लोकांचं कल्याण करायचं आहे. आपल्याला १४० कोटी लोकांचं कल्याण करायचं आहे. किमान शालेय पातळीवरचं अर्थशास्त्र शिका हो! असं म्हणत खोचक टोला लगावला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची तुलना इंग्लंडसोबत करणाऱ्यांना आव्हाड यांनी इंग्लंड आणि भारत यांच्यातील लोकसंख्येचा फरकही समजावून सांगितला. दरम्यान, आव्हाड यांनी याआधी आणखी एक ट्वीट करत भारतीय अर्थव्यवस्थेवर भाष्य केलं होतं. भारतीय अर्थव्यवस्था संकटात सापडली आहे. प्रथमच भारतावरील इतर देशांचे कर्ज अर्थात विदेशी कर्ज एकूण ६२०.७० अब्ज डॉलर्स पार गेले असून ते परकीय चलन साठ्यापेक्षा अधिक झाले आहे. एकीकडे महागाईने कहर केलेला असताना देशावर मोठ्या प्रमाणावर वाढते कर्ज कशाचे द्योतक आहे? असं म्हटलं होतं.

## कंटेनरमध्ये सापडून कामगाराचा मृत्यू



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सी डब्लू सी (डिस्ट्रीपार्क) भेंडखळ कोनेक्स टर्मिनल या मालाची हात–ळणी करणाऱ्या कंटेनर च्या मध्ये सापडून कल्मार मशीन च्या हेल्पर चा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी ( दि५) सकाळी अंदाजे १०:४५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. परंतु पोलीस यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारची माहिती दिली जात नाही.

उरण तालुक्याच औद्योगिकीकरण

.../२

## पर्समध्ये ठेवलेल्या सोन्याच्या मंगळसूत्राची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजीपाला खरेदी करण्याकरिता एक महिला घरा बाहेर पडली असताना तिने कापडी पिशवी मध्ये सोन्याचे मंगळसूत्र ठेवले असता अज्ञात चोरट्याने सदर मंगळसूत्र चोरल्याची घटना पनवेल जवळील करंजाडे येथे घडली आहे .

भक्ती वायभासे ( वय २२ ) रा. से. ०५ करंजाडे या तेथील टाटा पॉवर समोरील रस्त्यावर भाजीपाला खरेदी करण्याकरिता गेल्या असताना त्यांनी ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र कापडी पिशवी मध्ये ठेवले असतांना अज्ञात चोरट्याने सदर मंगळसूत्र चोरल्याची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे .

### कोकणातील गणेशभक्तांचा परतीचा प्रवास सुखकर होणार

## रामेश्वर कन्ट्रक्शन व जे.एम.म्हात्रे इन्फ्रा कंपनीने महामार्गावरील खड्डे भरून रस्ते केले चकाचक



**दै.रायगड नगरी । पेण**

पाच दिवसांच्या गणपती बाप्पाचे विसर्जन करून कोकणात गेलेल्या मुंबई, ठाणे येथील नोकरदाराची पुन्हा परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली आहे. मुंबई गोवा महामार्गावरील छोटे मोठे खड्डे भरून महत्वाची भूमिका बजावलेल्या रामेश्वर कन्ट्रक्शन व जे.एम.म्हात्रे इन्फ्रा कंपनीकडून आधुनिक पद्धतीने रस्ते चकाचक करण्यात आले असून त्यामुळे यंदा गणेश भक्तांचा परतीचा प्रवास सुखकर होणार आहे. मुंबई–गोवा महामार्गावर वाहतुकीचे नियंत्रण करण्यासाठी रायगड पोलीस प्रशासनही पुन्हा सज्ज झाले आहे. मुंबई–गोवा महामार्गावरील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून वाहतूक नियोजनासाठी उपविभागिय अधिकारी, पोलिस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांचा मोठा बंदोबस्त असणार असल्याचे रायगड पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

गणेशोत्सव हा कोकणवासीयांचा महत्वाचा सण मानला जातो. यासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, गुजरात व इतर राज्यातून लाखोंच्या संख्येने नोकरदार हे कोकणातील आपल्या घरी आले होते. वर्षानुवर्षे मुंबई–गोवा महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येला यंदा आळा बसला आहे. वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी

.../२

## शिवसेनेने पाठीत खंजीर खुपसलं, उद्धव ठाकरेंना जमीन दाखवा : ना.अमित शहा



**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील गणरायांचे दर्शन घेतल्यानंतर अमित शाह यांनी मुंबईत भाजपाच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केलं. यावेळी अमित शाह यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. तुम्हाला माहिती आहे, उद्धव ठाकरेंनी आपल्याला दगा दिला. शिवसेनेनं पाठीत खंजीर खुपसलं. त्यामुळे उद्धव ठाकरेंना जमीन दाखवा, असं अमित शाह म्हणाले.

भाजपने कधीच छोटा भाऊ–मोठा भाऊ म्हटले नाही. राजकारणात काहीही करा, पण धोका सहन करु नका. जे दगा देतात त्यांना योग्य शिक्षा झालीच पाहिजे. प्रत्येक कार्यकर्ता मैदानात उतरला पाहिजे. तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावावर, नेते देवेंद्र फडणवीसांच्या कामावर मतं मागितली आणि जिंकून आले. त्यानंतर तुम्ही जनतेचा विश्वासघात केला असल्याचे शाह यांनी सांगितले. मुंबईतल्या राजकारणावर वर्चस्व केवळ भाजपचं असावे, असं विधानही अमित शाह यांनी केलं आहे. उद्धव ठाकरेंनी केवळ दोन जागांसाठी २०१४ मध्ये आपल्यासोबतची युती तोडली. असा गौप्यस्फोटही अमित शाह यांनी केला. ते खयाली पुलाव पकवत होते. त्यांना वाटलेलं भाजपा युती तोडणार नाही. आपल्याशिवाय भाजपाचं काय होणार, आपल्याच जास्त जागा जिंकून येतील, असा त्यांचा समज होता. जो चुकीचा ठरला, असं अमित शाह यांनी सांगितले. स्वत:च्या चुकीमुळेच शिवसेना फुटली, स्वत:च्या निर्णयामुळे शिवसेना छोटा पक्ष झाला, असं अमित शाह यावेळी म्हणाले. त्यामुळे आगामी काळात राज्यातील राजकारण तापणार असल्याचं दिसून येत आहे.



अभिनेता सलमान खान यांच्याकडे अनेक वर्षे अगदी जवळचे साथी म्हणून ओळख असलेले बाळु माया कामडी यांनी आपली मुले राधे, सिकंदर, सपना यांच्यासह पोतदार कुटुंबियांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गणपती बाप्पाच्या दर्शनाला आर्वजुन भेट दिली. (छाया : आदेश पोतदार)

# आत्मनिर्भरतेचे दृश्य प्रतीक


स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असतानाच, नौदलाच्या ताफ्यात स्वदेशी बांधणीची विमानवाहू युद्धनौका समाविष्ट होणे, ही अभिमानास्पद बाब आहे. १९७१ च्या युद्धात गौरवशाली कामगिरी केलेल्या तत्कालीन 'आएनएस विक्रांत'चेच नाव घेऊन या दुसऱ्या विक्रांत नौकेचा जन्म झाला आहे. २० हजार कोटी रुपयांची ही विशाल, नयनमनोहर युद्धनौका म्हणजे आत्मनिर्भरतेचे व भारतीय तंत्रज्ञांच्या अविरत कष्टाचे प्रतीक आहे. कोचीन शिपयार्ड या व्यापारी जहाजबांधणीत पारंगत असलेल्या गोदीकडे 'विक्रांत'च्या उभारणीची जबाबदारी देण्यात आली होती. विमानवाहू युद्धनौका म्हणजे दीड-दोन हजार नौसैनिक राहतील, असे एक शहरच. ते बांधण्यासाठी शेकडो छोटे-मोठे उद्योग या प्रकल्पाशी जोडले गेले. या निमित्ताने एकूणच स्वदेशी उद्यमशीलतेचा विकास होत असतो, हा आणखी एक आनुषंगिक लाभ. गेले वर्षभर समुद्री चाचण्यांचा टप्पा पार केल्यावर तिचा दक्षिण कमांडमध्ये रीतसर प्रवेश झाला. अर्थात, भारतीय नौदलापुढील आव्हाने पाहता कदाचित ती पुढे पूर्व कमांडमध्ये तैनात होऊ शकेल. यामुळे पुढील काही काळ तरी पश्चिम तटावर एक आयएनएस विक्रमादित्य व पूर्व तटावर आयएनएस विक्रांत अशा दोन विमानवाहू युद्धनौका सज्ज ठेवण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल. विमानवाहू युद्धनौका म्हणजे कुठेही कधीही नेता येईल, असा तरंगता विमानतळ. अमेरिकेने त्यांच्या भूमीपासून दूर अंतरावरून युद्धे खेळताना अफगाणिस्तान व इराकच्या युद्धांमध्ये अशा तरंगत्या रणभूमींचा खुबीने वापर केला. भारताच्या कुरापती काढणाऱ्या चीन व पाकिस्तान या शेजाऱ्यांकडे कित्येक वर्षे विमानवाहू युद्धनौका नव्हत्या व त्यांची भिस्त पाणबुडी या छुप्या अस्त्रांवर अधिक होती. परंतु गेल्या दशकात चीनने अचानक विमानवाहू युद्धनौकांच्या क्षेत्रात उडी घेतली व व्यापारी जहाजावर बेतलेली पहिली विमानवाहू युद्धनौका आणली. तिच्यापाठोपाठ धडाकाच लावला. अलीकडेच चीनने जिबुटी बेटावरील आपला नौदल तळ कार्यान्वित केला. श्रीलंकेच्या हंबणटोटा बंदरात नांगरलेली संशोधक नौका किंवा पाकिस्तानच्या ग्वादार बंदराचा विकास तसेच अरबी समुद्रापर्यंत आणलेल्या पाणबुड्या यांतून चीनची समुद्री महत्त्वाकांक्षा दिसते. खासकरून हिंदी महासागरात चीन अधिक लक्ष घालत आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या नौदलाच्या कार्यकक्षा विस्तारित ठेवाव्या लागणार. हिंदी महासागर व हिंद-प्रशांत क्षेत्र हे आता सुप्त संघर्ष व महत्त्वाकांक्षांचे नवे रणांगण होते आहे. भारताचा ९५ टक्के व्यापार सागरी मार्गांनी होतो. या क्षेत्रातील तेल, वायू व नैसर्गिक साधनसंपत्ती यातही संघर्षाची बीजे आहेत. त्यामुळेच तीन विमानवाहू युद्धनौकांची मागणी भारतीय नौदल कायम करत आले आहे. विमानवाहू युद्धनौका हे आता प्रभावी अस्त्र आहे का, त्यावर हजारो कोटी खर्च करावेत का, असा प्रश्न काही जण उपस्थित करतात. मात्र, आजही बलाढ्य नौदले विमानवाहू युद्धनौकांवर भिस्त ठेवतात. विक्रांत मायदेशात बांधल्यानंतर आपण सहा बलाढ्य राष्ट्रांच्या पंक्तीत गेलो आहोत. आता सुयोग्य लढाऊ विमानांनी या नौकेचा पल्ला व शक्ती कशी वाढेल, यावर भर द्यावा लागेल. भारतीय नौदलात १९६० च्या दशकात स्वयंपूर्णतेचे पर्व सुरू झाले. युद्धनौकांचा 'आरेखन व विकास विभाग' नौदलाने उभारला. त्याचे या कामगिरीत मोठे योगदान आहे. या आरेखनावर आधारित नौदलाच्या गरजांनुरूप जहाजनिर्मिती गोद्यांमधून युद्धनौका बनू लागल्या. आज ३९ युद्धनौकांची निर्मिती भारतात सुरू आहे. या आधुनिक स्वदेशी युद्धनौकांनी भारताकडे बघण्याची इतर देशांची दृष्टी बदलली. अर्थात, आरमारी आव्हाने सागराइतकीच अथांग असतात. युद्धनौकांचे प्रकार बदलले, तसतशी त्यांची हाताळणी, परिचालन यांतही डोळ्यांत तेल घालून अपघातविरहित कामकाज करावे लागते. ४५ हजार टनांच्या आजवरच्या सर्वांत मोठ्या आयएनएस विक्रांतच्या निर्मितीने युद्धखेळीचे आयामच बदलतील, असा होरा आहे. आणखी एक प्रतीकात्मक बदल या निमित्ताने भारतीय नौदलात घडला आहे. नौदलाच्या ध्वजातील ब्रिटिश शाही सत्तेचा अंमल चिन्हांकित करणाऱ्या लाल क्रॉसला सोडचिठ्ठी देण्यात आली. त्याऐवजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेपासून प्रेरणा घेतलेली अष्टकोनी मुद्रा आणि त्यात अशोकस्तंभ, 'सत्यमेव जयते' हे वचन, नांगर व 'शं नो वरुणः' हे नौदलाचे ब्रीदवाक्य असे चिन्ह ध्वजावर विराजमान झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी केलेल्या भाषणातील पंचप्राणांपैकी 'गुलामगिरीचे जोखड फेकून द्या', या वचनाचा उल्लेख होता. स्वाभाविकच त्यानुसारच हे पाऊल आहे. छत्रपती शिवरायांनी सागरी आक्रमणांचा धोका ओळखला व त्यानुसार बलाढ्य आरमार उभारले. त्यांचे अधिष्ठान ध्वजास लाभणे हे उचितच आहे. परंतु प्रतीकांमधील गुलामगिरी झुगारून टाकताना, आपल्या नौसैनिकी प्रथा-परंपरांमधील शाही अंमल व त्यांचे अवडंबर यांचाही फेरविचार क्रमप्राप्त आहे. एकूणच युद्धसामग्री खरेदी, निर्मिती यांच्याबाबत विश्वासार्हता वाढणे व निर्मितीतील विलंब कमी करणे, हेही राष्ट्रसुरक्षेसाठी गरजेचे आहे.

# ८१ वर्षाची रुढी परंपरा यांचे जतन करणारे खोपटा गावातील गौराई उत्सव बनले भाविकांचे श्रध्दास्थान

**दै.रायगड नगरी । उरण**

रुढी परंपरा यांचे जतन करण्यासाठी खोपटा गावातील शिव मंदिरात गणेशोत्सवाचे औचित्य साधून याही वर्षी मोठ्या भक्तिभावाने गौराई ( शंकर, पार्वती आणि श्री गणेश ) मुर्तींची प्रतिष्ठापना गौराई मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.रविवार दि४ सप्टेंबर रोजी प्रतिष्ठापना करण्यात आलेले गौराई उत्सव ८१ वर्षात पदार्पण करत असल्याने मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी, ग्रामस्थांनी सामाजिक भावनेतून खोपटा गावात विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले आहेत.

स्वातंत्र्य काळात रहिवाशांमध्ये एकोपा निर्माण व्हावा यासाठी १९४१ साली खोपटा पाटील पाडा येथील रामजी तुकाराम पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रामस्थ मंडळाची स्थापना करुन गौराई उत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला होता.आज ही या मंडळाचे पदाधिकारी, सदस्य हे आपल्या आजोबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून खोपटा गावात गौरा म्हणजे शंकर,पार्वती आणि गणपती याची एकत्रित शिवगौऱ्याच्या मूर्तीची प्रतिस्थापना मोठ्या भक्तिभावाने पूजा अर्चा, धार्मिक विधी करुन करत आहेत. पाच दिवस साजरा होणाऱ्या उत्सवामध्ये विविध सामाजिक उपक्रम, धार्मिक



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत.

गौराई उत्सवाच्या पहिल्या दिवशी मात्र महिलावर्गाला दर्शन दिले जात नाही. त्याचे कारण म्हणजे शिव शंकराला त्या दिवशी बांगडीच्या आवाजाने नृत्यामध्ये भंग होऊ नये म्हणून महिला वर्ग पहिल्या दिवशी दर्शनास जात नाहीत.आणि त्या परंपरेचं जतन महिला भगिनी करत आहेत. रात्री १२ वाजता शिवगौरा एका पुरुषाच्या अंगात येत असल्याने हा महिमा बघण्यासाठी उरण परिसरातील तरुण वर्गानी मोठ्या संख्येने आपली उपस्थिती दर्शविली होती .

शिव मंदिरात स्थापन करण्यात आलेल्या शिवगौऱ्या च्या मूर्ती सोबत पारंपारिक देखावा म्हणून यावर्षी खोपटा गावातील भालचंद्र म्हात्रे यांनी श्री कृष्णाची सुवर्ण तुला करण्याचा सुंदर देखावा सादर केला आहे.गौराई उत्सवाचे औचित्य साधून मोठ्या संख्येने भाविकांनी मंदिरातील शिवलिंग व गौराईच दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती.तसेच गाव परिसरातील अनेक भक्तांनी ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत आप आपल्या कुटुंबासह गौराईचे नवस फेडण्यासाठी तल्लीन होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री गौराई उत्सवाचे औचित्य साधून गावातील मूलांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी चित्र कलेचं आयोजन करण्यात आले होते.यावेळी लहान मुलांची उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला होता.तसेच पाच दिवस चालणाऱ्या या उत्सवाचे औचित्य साधून मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी महा आरोग्य शिबीरा बरोबर इतर सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्णय यावर्षी ही घेतला आहे.असे मंडळाचे अध्यक्ष प्रशांत पाटील व सत्यवान भगत व त्यांच्या सहकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

# सुधागडात पाच दिवसाच्या गणपती बाप्पाचे विसर्जन



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

'गणपती बाप्पा मोरया..पुढच्या वर्षी लवकरच या, अशा जयघोषात सुधागडकरांनी पाच दिवसांच्या बाप्पांना सोमवारी निरोप दिला. सायंकाळपर्यंत अनेक घरगुती व सार्वजनिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. विसर्जनादरम्यान अनुचित प्रकार टाळण्यासाठी पाली पोलिसांकडू चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पाली,पेडली,जांभुळपाडा,परळी, अंबानदीत येथे गणेश विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली होती.

आसमंतात घुमनारा शंखनाद... इमारतींवरून होणारी फुलांची उधळण... वेगवेगळ्या तालांवरील ढोल-ताशांचा दणदणाट... 'मोरया'चा जयघोष करत वादकांना दिली जाणारी उत्स्फूर्त दाद... उकाडा असला तरी क्षणाक्षणाला वाढणारी गर्दी... नानाविध रूपातील गणरायाचा थाट आणि हे सगळे अनुभवण्यासाठी लोटलेला जनसागर... अशा आनंददायी वातावरणात सुधागडकरांनी गणपतींना सोमवारी निरोप दिला. सायंकाळी साडेसातपर्यंत गणपतींची विसर्जन मिरवणूक चालली.

बाप्पांचा विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा, यासाठी पाली पोलिसांचे पथक ठिकठिकाणी तैनात ठेवण्यात आले होते. पाच दिवसांच्या बाप्पांच्या विसर्जनासाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

दहा दिवसांच्या गणपती विसर्जनाला होणारी गर्दी लक्षात घेऊन बंदोबस्तात वाढ करण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# मुंबई कोळी समाज मजगांव तर्फे सेवानिवृत्त कुटुंबियांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

सामाजिक क्षेत्रात सेवाभावी कार्य करणाऱ्या मुंबई कोळी समाज मजगाव तर्फे मुरुड तालुक्यातील मजगांव येथील विविध क्षेत्रात आपली सेवा करून निवृत्त झालेल्या सेवानिवृत- कुटुंबियांचा नुकताच एका आयोजित कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. यावेळी गजानन बाजी, गणेश गोयजी,रोहिदास गोयजी, राजा मानाजी, भाविका गोयजी, कमाने गुरुजी, प्रगती गोयजी, गजानन अंबाजी, कमलाकर अंबाजी, सुप्रिया मानाजी यांसह समाज बांधव उपस्थित होते. सुरुवातीला कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा आंतरराष्ट्रीय मानवाधिकार समितीचे महासचीव पंडित फंगाळ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी मुंबई व अन्य ठिकाणी विविध क्षेत्रात सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या पांडुरंग भोईनकर, दिगंबर अंबाजी, काशिनाथ भोईनकर यशवंत अमृते, सुधाकर बाजी यांचा समाजातर्फे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देण्यात येऊन सन्मान करण्यात आला.



**ठाकूर इंफ्राप्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेडच्या पाडेघर विभागात कोमात्सुच्या चार नवीन 'एक्सकैवेटर' दाखल झाल्या असून या मशिनरीचे पूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, मयूर ठाकूर तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नातू अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर व आदित्य ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यवस्थापक जगदीश घरत, विभाग प्रमुख चिंतामण घरत तसेच इतर सहयोगी उपस्थित होते.**

# रायगडभूषण नारायण सोनवणे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचे रायगडभूषण नारायण सोनवणे यांचा युनिटी वेल्फेअर क्लब ऑफ मुंबई, भायखळा वतीने रायगड जिल्हा परिषद किरवली शाळेत आदर्श शिक्षक पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.कर्जत, पेण तालुक्यातील केंद्रप्रमुख, शिक्षकांचा यात समावेश होता.

कार्यक्रमात प्रस्तावना शिक्षिका साळोखे केंद्रप्रमुख भीसेगाव यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजक मनोहर पाटील यांनी शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांचे योगदान आणि पेण, कर्जत तालुक्यात केलेले भरीव कार्य याबद्दल शिक्षकांचे अभिनंदन केले.

शिक्षक दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमामध्ये क्लबचे अध्यक्ष निशांत पिलाई, उपाध्यक्ष सुनील कोरके, सेक्रेटरी अपर्णा अय्यर, कर्जत, पेण तालुक्यातील अनेक शिक्षक मान्यवर उपस्थित होते.

अनेक मान्यवर शिक्षक, केंद्रप्रमुख यांचा सन्मान केल्याबद्दल मनोहर पाटील आणि धराडे यांनी सर्वांच्या वतीने क्लबचे हार्दिक आभार मानले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## रोहा : गौरी गणपतींच्या ९०६ बाप्पांसह २७५ गौराईंना भावपुर्ण निरोप!

गर्दी उसळली होती. हातगाडी तसेच खाजगी वाहनांनी विसर्जना साठी निघालेल्या बाप्पांना पाहण्यासाठी शहरातील मुख्य हमरस्त्यावर जनसमुदाय लोटला होता. यावेळी उसळलेल्या गर्दीच्या नियोजनासाठी रोहा पोलिसांनी विषेश पोलिस व्यवस्था हि ठेवली होती. भक्तगणांनी गणपती बाप्पा मोरया , पुढच्या वर्षी लवकर या असे गजर करीत आपल्या बाप्पांचे कुंडलिका नदी किनारी भावपुर्ण आणी भक्तीमय वातावरणात विसर्जन केले. तालुक्यात गेले काही दिवस पावसाने थोड़ी उसंत घेतल्याने यंदा विसर्जनात कुठलेही विघ्न आले नाही. रोहा तहसिलदार कविता जाधव यांनी विसर्जन स्थळांना भेट देउन नागरीकांना आणि गणेशभक्तांना कुठलिहि असुविधा निर्माण होउ नये यासाठी पहाणी केली. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडु नये यासाठी रोहयाचे पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांनीही विसर्जन स्थळांना भेट देऊन पाहणी केली, त्याचप्रमाणे चोख पोलिस बंदोबस्त ठेवले होते. रोहा तालुक्यात पाच दिवसांच्या एकूण ९०६ बाप्पां आणि २७५ गौराईंना विसर्जन करण्यात आले असल्याची माहीती रोहा पोलीस ठाण्याचे कल्पेश कांबळे यांनी दिली.

## कंटेनरमध्ये सापडून कामगाराचा मृत्यू

झपाट्याने वाढत आहे.अशा वाढत्या औद्योगिक क्षेत्रात शासकीय नियमांची पायमल्ली करून प्रकल्पात, मालाची हाताळणी करणाऱ्या कंटेनर यार्ड मध्ये रात्री अपरात्री कामकाज सुरू असते.त्यामुळे मात्र निष्पाप कामगारांना नाहक आपले प्राण गमवावे लागत आहे. मागील दहा दिवसांपूर्वी वेश्वी ग्रामपंचायत हद्दीतील के.के.लाँजिस्टीक या कंटेनर यार्ड मध्ये एका कामगाराला शाँक लागून दुदैवी मुत्यू घडण्याची घटना घडली होती. त्या कामगारांच्या मुत्यूला बारा दिवस होत नाहीत तोच भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीतील कोनेक्स टर्मिनल या कंटेनर यार्ड मध्ये कल्मार हेल्पर या कामगारांचा दोन कंटेनर मध्ये सापडून, चिरडून दुदैवी मुत्यू झाल्याची घटना सोमवारी ( दि५) घडली आहे.

## कोकणातील गणेशभक्तांचा परतीचा प्रवास सुखकर होणार

रायगड जिल्ह्यातील सुमारे १४५ किलोमीटरच्या मार्गावर पोलीस कर्मचारी आणि अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच रायगड जिल्ह्यातील या मार्गावरील महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीच्या नियंत्रणासाठी याची विशेष मदत होणार आहे. तर मुंबई-गोवा महामार्गावरील रहदारीसाठी महत्त्वाचे ठिकाण असलेल्या खारपाडा, हमरापूर, वडखळ, कशेडी आदि महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस चौक्यांसह, ॲम्ब्युलन्स आणि क्रेनचीसुद्धा व्यवस्था करण्यात आली आहे. गणेशोत्सव काळानंतर भक्तांच्या परतीच्या प्रवासासाठी रायगड जिल्ह्यातील पोलीस बळाव्यतिरिक्त होमगार्ड्स व राज्य राखीव दल तैनात असणार आहेत. दरवर्षी खड्ड्यांची समस्या असलेल्या मुंबई गोवा महामार्गावरील छोटे व मोठे खड्डे राजू पिचिका यांच्या रामेश्वर कन्ट्रक्शन व जे.एम.म्हात्रे इन्फ्रा कंपनीकडून जेएसबी, बोझर, सिमेंट कोंक्रीट, डांबर, हॉटमिक्स्चरच्या व इतर मशिनरीच्या सहाय्याने तसेच आधुनिक पद्धतीने भरले असून यंदा प्रथमच मुंबई गोवा महामार्ग चकाचक झाला असून त्यामुळे गणेश भक्तांचा परतीचा प्रवास सुखकर होणार आहे. खारपाडा ते कशेडी घाट या दरम्यान सहा विभागात वाहतुक नियंत्रणाचे नियोजन केले आहे. या मध्ये उपविभागिय पोलिस अधिकारी, पोलिस अधिकारी, पोलिस कर्मचारी तर १० ठिकाणी पोलिस चौक्या उभारल्या असून या ठिकाणी हायड्रा, क्रेन, रुग्णवाहीका सज्य ठेवण्यात आल्या आहेत. तर महत्वाच्या ठिकाणी सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासासाठी मुंबई-गोवा महामार्गावरील अवजड वाहतुक बंद कायम ठेवण्यात आली आहे. कोकणवासी मोठ्या संख्येने गणेशोत्सव विसर्जन उरकून पुन्हा मुंबई ठाणेच्या दिशेने येतील अशी अपेक्षा आहे, त्यांना कोणताही त्रास होवु नये, वाहतुक कोंडी होणार नाही अशी उपाय योजना करण्यात आली असून त्यांचा परतीचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी राज्य शासनासह रायगड पोलिसांनी योग्य नियोजन केले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील व्यक्तीचे मालकीचा व ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन आमचे अशिल १) श्री.सितेन्द्रसिंग अमरिकसिंग संधू २) जातींदर परमजीत सिंग पत्ता : एन एल-५, बिल्डींग नी-२६, रुम नो-७, शनी मंदिर बाजूला, सेक्टर ११, नेरुळ, नवी मुंबई यांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**१) श्री.राम लक्ष्मण म्हस्कर २) श्री.बबन लक्ष्मण म्हस्कर ३) सौ.आनंदीबाई जोमा भोईर यांच्या मालकीची सदनिका**

**मौजे ओवे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| ओवे | ४५६/८ | ०.०५.०५ | ०.०० |

सबब वर नमूद जमिनीवर कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळवहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस चार्ज लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत हक्क हितसंबंध स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा हरकत, तक्रार दावा, हितसंबंध नाही असे समजून आमचे सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०९/२०२२

**सही/-**
**ॲड.राहुल ब लोंढे**
**पत्ता : १०१, खोडाल धाम, भूखंड क्र.५३, सेक्टर-१९, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील व्यक्तीचे मालकीचा व ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन आमचे अशिल १) श्री.सितेन्द्रसिंग अमरिकसिंग संधू २) जातींदर परमजीत सिंग पत्ता : एन एल-५, बिल्डींग नी-२६, रुम नो-७, शनी मंदिर बाजूला, सेक्टर ११, नेरुळ, नवी मुंबई यांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**१) श्री.अबिद हुसेन अन्सारी यांच्या मालकीची सदनिका**

**मौजे ओवे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|
| ओवे | ४५६/८ | ०.०६.०५ | ०.०० |

सबब वर नमूद जमिनीवर कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळवहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस चार्ज लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत हक्क हितसंबंध स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा हरकत, तक्रार दावा, हितसंबंध नाही असे समजून आमचे सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०९/२०२२


**सही/-**
**ॲड.राहुल ब लोंढे**
**पत्ता : १०१, खोडाल धाम, भूखंड क्र.५३, सेक्टर-१९, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# एक गाव एक गणपती ही अखंड परंपरा जपणारं पनवेल तालुक्यातील रिटघर हे एक आदर्श गावं!

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संपूर्ण महाराष्ट्रात आणि त्यातच कोकणात अत्यंत उत्साहात साजरा केला जाणारा सण म्हणजे' गणेश चतुर्थी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरवात करून सार्वजनिक गणेश उत्सवाला सामाजिक आणि व्यापक रूप देण्याचं काम टिळकांनी त्या काळात केलं !...आणि आज पण तिच परंपरा तोच उत्साह आणि व्यापकता जपणारी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि गावं आपली परंपरा जपताना दिसतात !...त्यातलचं ... एक गाव एक गणपती ही ...४८ वर्षांची ...अखंड परंपरा जपणारं...रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील ...रिटघर ...हे एक आदर्श गाव ...गावं तसं लहान पण कीर्ती महान !असं म्हटलं तर वावगं ठरणारं नाही !...सन १९७४ या साली रिटघर गावाच्या ग्रामस्थांनी पहिल्यांदा आपल्या गावात एक गाव एक गणपतीची... संकल्पना मांडली आणि ती संकल्पना सर्व ग्रामस्थांनी खऱ्या अर्थाने सत्यात उतरवत त्याच वर्षांपासून आपल्या गावातील हनुमान मंदिरात सर्व गावाच्या वतीनं एक गणपती बसविण्यात आला...आणि एक आदर्शवत सुरुवात केली ती ह्या ...रिटघर गावाने.



स्व. ह.प.भ.भागोजी महाराज सांगडे, स्व.पांडुरंग महाराज परळी वैजनाथ, स्व.ह.प.भ. बाळू भोपी महाराज, स्व.धोंडू भोपी, शंकर भोपी, स्व.मुंगा पाटील कै. पुंडलिक शंकर भोपी कै.पांडुरंग सदु भोपी ...ह्या सर्व मंडळींनी जी आत्ता हयात नाहीत आणि सोबतच, बाळाराम पाटील, किसन पाटील, गणूबुवा भोपी, रामभाऊ भगत, विठ्ठल भोपी, सुभाष शेठ भोपी, गणु जयराम भगत, गोपीनाथ शेठ भोपी, धर्मा बुवा भोपी ..ह्या मंडळींच्या पुढाकारातून आणि सर्व ग्रामस्थांच्या एकजुटीतून या उत्सवाच्या माध्यमातून गावात आनंद प्राप्त व्हावा एक आदर्श निर्माण व्हावा , याच उद्देशाने एक गाव एक गणपती ही परंपरा जपली गेली आणि खऱ्या अर्थाने अनावश्यक खर्चाला फाटा देत आपल्या समाज बांधवांना आणि खास करून तरुणांना एकत्रित करत समाज बांधणीची परंपरा ही याच मांडणीतून सुरू झाली.

आज साऱ्या पंचक्रोशी सह संपूर्ण तालुक्यात आपल्या कार्याने आदर्श निर्माण करणारा ... एक गाव एक गणपती उत्सव साजरा करणारा ... रिटघर गाव....हा कोणतंही कार्यक्रम असो, मंडळाची, ग्रामस्थांची एकजूट ही प्रशंसनीय असतो !...आनंदही मोठा असतो !...सर्वांच्या मध्ये उत्साह हा भरलेला असतो गावातील अबाल– वृद्ध, महिला भगिनीं, आणि खास करून तरुणांचा उत्साह वाखाणण्याजोगा असतो...आणि ह्याच उत्साहातून ...गेली ... ४८ वर्षे .... एक गाव एक गणपती ही परंपरा जपली जातोय आणि ह्याच परंपरेचा वारसा जपणाऱ्या ह्या एक गाव एक गणपती उत्सवाला २०१६ सालचा .... विघ्नहर्ता पुरस्कार....ह्या .... रिघरच्या राजाला मिळाला आहे.

आजकाल प्रत्येक घरां– घरांत विराजमान होणारे गणपती बाप्पा पाहता आणि सार्वजनिक मंडळाचा वाढता प्रतिसाद पाहता,... एक गाव एक गणपती ही परंपरा अबाधित ठेवणारं गाव ...अर्थात रिटघर हे गाव ...ज्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा असाच आदर्शवत गावं... सर्व भेद – भाव ,सर्व मतभेद बाजूला ठेऊन ...राजकारण विरहित फक्त आणि फक्त समाजहित डोळ्यांसमोर ठेवून सर्व राजकीय मतभेद बाजूला सारून विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ ह्या दिवसात एकत्र येत एकोप्याचं दर्शन देत ह्या उत्सवात एकत्रित काम करतांना दिसतात!...आपल्या गावाचं नाव मोठं करतानां दिसतात !!... ह्या सोहळ्यात आपल्या सण– संस्कृतीचं आपल्या,अस्मितेचं जतनं व्हावं म्हणून ...आपल्या वारकरी संप्रदायाच्या परंपरे नुसार ...गणपती उत्सवाच्या काळात ...हरिपाठ,आरती,भजन,कीर्तन,काकडा,प्रवचन,ज्ञानेश्वरी पारायण, जागर ह्या सारख्या भक्तिमय कार्यक्रमासोबतच ... विविध क्षेत्रात आणि खास करून शिक्षण क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या युवक– युवतीनां आणि विद्यार्थी वर्गाला सन्मानीत करून प्रोत्साहित केलं जातोय आणि खास करून ह्या उत्सव काळात दरवर्षी शासकीय सेवेतील मोठं मोठे अधिकारी, पोलिस दलातील अधिकारी,तसेच माननीय तहसीलदार साहेब यांच्या सह अनेक मान्यवर बाप्पाच्या दर्शनाला आवर्जून उपस्थिती दर्शवितात,आणि म्हणूनच येथे गणपती बापाच्या दर्शनाकरिता येणाऱ्या प्रत्येक मान्यवरांचां यथोचित मान– सन्मान करून त्यांना सन्मानीत देखील केलं जातोय ते रिटघर गावाच्या ग्रामस्थांच्या वतीने !... सोबतच येणाऱ्या भक्त गणांचं आणि ग्रामस्थांचं ह्या भक्तिमय दिवसांत मनोरंजन व्हावं म्हणून गीत–संगीत कार्यक्रमाचं आयोजन करत मनोरंजनात्मक कार्यक्रमाद्वारे ग्रामस्थां सोबत येणाऱ्या प्रत्येक भाविकांनां ह्या आनंदमय पर्वणीतून मंत्रमुग्ध केलं जातोय, सोबतच व्याख्यानं,प्रवचनं यांच्या माध्यमाद्वारे समाज प्रबोधनाच्यां कार्यक्रमातून ...समाजप्रबोधना सोबतच समाज्यात नवंपरिवर्तन देखील केलं जातोय !... आणि हे सर्व करत असताना सर्व ग्रामस्थांचे योगदान हे वाखाणण्याजोगे असते !आणि म्हणूनच गणेश उत्सवाच येणारं ...५० ( पन्नासावं )... सुवर्ण मोहत्सवी वर्ष ...हे अगदी मोठ्या...जल्लोषात, उत्साहात ...आणि ... धुमधडाक्यात साजरं केलं जाईल अशी माहिती ...रिटघर गावचे.. सामाजिक कार्यकर्ते ...आणि... रायगड भूषण ... मा.श्री.भारतदादा भोपी यांनी दिली.

नक्कीच ह्या ...रिटघर गावाचा...आदर्श इतर सर्व गांवानी घेतला तर ...गणेश उत्सव कसा साजरा करावा याची नक्कीच एक उत्कृष्ट कल्पना आणि प्रेरणा सर्वांच्या मनात घर करून बसेल आणि त्यातूनच समाज्यात एक नवी परंपरा उदयास येईल आणि अनावश्यक खर्च टळेलचं ! आणि गावांमध्ये एकजूट,संघटितभाव,सेवाभाव,सर्वधर्म समभाव ही भावना वाढीस लागेल आणि तीच प्रेरणादायी भावना प्रत्यक्षात जणमाणसांत रुजावी या करिता अश्याच मंडळाची,अश्याच आदर्शवत गावांची खऱ्या अर्थाने आज समाज्याला आणि देशाला खरी गरज आहे आणि खरं पाहता ...रिटघर गावाचा एक गाव एक गणपती हा उत्सव ही परंपरा सांगण्या ऐकण्याची नव्हे तर अनुभवण्याची गोष्ट आहे आणि म्हणूनच हा आनंदोत्सव,ही अखंड परंपरा जर पाहायची असेल,अनुभवायची असेल तर या उत्सव काळात या आदर्शवत अश्या रिटघर गावाला एक वेळ जरूर भेट द्या !


**सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**दैनिक रायगड नगरी**
**9619979706 / 9619737911**



**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


अर्जदाराचे वकील हिना नार्लेकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१२४०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०७/१०/२०२२

१) सौ.शैनाज सत्तार पटनी
वय : ५१, गृहिणी
२) श्री.फिरोज इस्माईल पटनी
वय : ५२ वर्षे, व्यवसाय / शेती
३) श्री.रफिक इस्माईल पटनी
वय : ४९ वर्षे, व्यवसाय / शेती
४) सौ.मुमताज कदर खान
वय : ४६ वर्षे, गृहिणी
५) सौ.बेनजीर इस्माईल पटनी
वय : ४८ वर्षे, गृहिणी
६) श्री.इम्जीयाज इस्माईल पटनी
वय : ४७ वर्षे, व्यवसाय / शेती
७) सौ.जीनत इस्माईल पटनी
वय : ४५ वर्षे, गृहिणी — अर्जदार

विरुद्ध

जिल्हाधिकारी तर्फे सरकार — सामनेवाला

वरील नमूद अर्जदार यांनी कै.अमीना इस्माईल पटनी यांचा वारस दाखला मिळणेकरिता सदरचा दिवाणी चौकशी अर्ज या मे.कोर्टात दाखल केला आहे. कै.अमीना इस्माईल पटनी यांचा मृत्यू दि.२७/०४/२०२० रोजी झाला आहे. सदर मृत व्यक्तीस वरील सर्व अर्जदार हे वारस असून त्यांच्या नावे वारस दाखला मिळणे करितेचा अर्ज करत आहेत.

सदर चौकशी अर्जाच्या कामी अर्जदार यांनी केलेल्या मागणीबाबत जर कोणाला हरकत घ्यायची असेल तर ती त्याने सदरची नोटीस जाहीर झाल्यापासून १ महिन्याच्या आत पनवेल येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात घेण्याची आहे. १ महिन्यानंतर आलेल्या हरकतीला फेटाळण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्याया, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्याया, पनवेल**

## PUBLIC NOTICE

This Public Notice is issued in the interest of General Public at large to safeguard their interest and protect them from getting cheated from/ by the Builder/Developer SAPAN PROMODKUMAR NASKAR & VIJAY SOMDATT NAGPAL of the project name SUNFLOWER, SITUTED AT PLOT NO. 177, SECTOR-9, ULWE, NAVI MUMBAI. All the flats in this project are completely sold by the Builder to the first owners and the first owners have jointly formed society under the name and style of SUNFLOWER CHS LTD., and the same is duly registered before Society Jt Registrar, Raigad Bhavan, Sector-11, CBD Belapur, Navi Mumbai-400614 vide bearing registration number N. B. O. M / CIDCO. H.S.G. / (T.C.)/7394/JTR/YEAR 22018-2019.

Society has already got the deem conveyance order from the society registrar vide order dated 25/01/2019 and it under process for the transfer of the land in the name of the Society before CIDCO.

The Society hereby inform the General Public that the builder has further sold the flats of the said project to multiple buyers and for which an F.I.R. bearing no. 206/2016 of Kalamboli Police Station has lodged against the Builder, Promoter/Developer SAPAN PROMODKUMAR NASKAR & VIJAY SOMDATT NAGPAL and the Case is pending for trial before Panvel Court. The Builder SAPAN PROMODKUMAR NASKAR is WANTED and he is ABSCONDING from Court of Law, RERA Authority, EOW of Navi Mumbai Police. SAPAN PROMODKUMAR NASKAR is on interim bail from Bombay High Court.

The Society hereby giving public notice at large in the interest of the public that if anyone gets any kind of Lucrative Offer directly from Builder SAPAN PROMODKUMAR NASKAR or through any other sources like Real Estate Agent Pertaining / online advertisement from HOUSING.COM , 99 ACRES.COM, COMMON FLOOR.COM ETC., Pretend for sale of flats in the said building on cheap rate must report it to the nearest Police Station, Commissioner of Navi Mumbai Police, and various Law Enforcing Agency so that it would be helpful to arrest such person and keep our society safe from such offenders.

Through this Public Notice if any person is dealing in any unit of Flat without prior informing the committee members of this society then they shall be sole liable for their transaction and any new person claiming rights and interest will not be entertained.

By the Committee Members of the Society in the Interest of Public awareness.

Chairman Secretary Treasurar.

BEFORE THE REAL ESTATE APPELLANT AUTHORITY
MAHARASHTRA AT KALAGODA MUMBAI
APPEAL NO.AT006000000053300

1. Mehmood Alam Khan
Adult Indian inhabitant, having his
Address at Flat No.181-A, Sector-17,
Nerul (East), Navi Mumbai
(Owner of Flat no. 102 on 1stfloor)
2. Ms. Edel Quine Mathias
An adult, Indian Inhabitant
Residing at 303, Parimal Apartment
Shreya CHS, Plot No. C1 Sector-23,
Seawoods, Navi Mumbai
(Owner of Flat no. 103 on 1stfloor )
3. Tatyasaheb Digambar Kodag
Adult, Indian inhabitant, having
Address at Flat No. B-104, Sailesh
Tower Co-op. Hsg. Soc. Ltd., Plot
No.12, Sector 19-A,
Nerul, Navi Mumbai
(Owner of Flat no. 104 on 1stfloor
4. Mehmood Alam Khan
4a. Mrs. Parveen Shama Khan
Both adult Indian inhabitants,
Having address at Plot No.181-A,
Sector 17, Nerul (East),
Navi Mumbai
(Owner of Flat no. 105 on 1stfloor)
5. S. Murugan Pillai
5a. Mrs. Maheshwari Manas Naskar
Both adult Indian inhabitants,
Having address at Flat No.2:1,
Shri Krishna Co-op. Housing
Society, Vrindavan Complex,
Sukapur, New Panvel (East),
Pin Code - 419 206
(Owner of Flat no. 201 on 2nd floor)
6. Shiv Kumar Taneja
Adult Indian inhabitant having
Address at Kasturi Villa, D-52,
Sector 12, Kharghar, Navi Mumbai
(Owner of Flat no. 203 on 2ndfloor)
7. Mrs. Parveen Shama Khan
Both adult Indian inhabitants,
Having address at Plot No.181-A,
Sector 17, Nerul (East),
Navi Mumbai
(Owner of Flat no. 204 on 2ndfloor)
8. Mrs. Ruma Maji
8a. Ashish Kumar Maji
Both adult Indian inhabitants,
Having address at Flat No.502,
Sai Siddhi, Plot No.55, Sector 18,
Kharghar, Navi Mumbai
(Owner of Flat no. 205 on 2nd floor)
9. Mrs. Sharada Tatyasaheb Kodag
Adult Indian inhabitant having
Address at Flat No.104, Shailesh
Tower, Plot No.12, Sector 19A,
Nerul, Navi Mumbai 400 706
(Owner of Flat no. 301 on 3rd floor)
10. Ankush Janardhan Patil
10a. Mrs. Hemlata Ankush Patil
both adult Indian inhabitants,
having address at Bungalow No.506
Quality Complex Adai, Panvel
Dist. Raigad 410 206
(Owner of Flat no. 302 on 3rd floor)
11. JaysheelMallinathNavani
adult Indian inhabitant having
address at Flat No.202, Janki
Niwas, Plot No.28, Sector 12,
New Panvel (East)
(Owner of Flat no. 303,304,401 on)
3rd floor and 4th floor respectively)
12.Suhas Vasant Patil
adult Indian inhabitant having
address at Flat No.12, B-Wing,
Prince Paradise CHS, Plot No.125A,
Near Ghodke Hospital, Panvel
Pin Code -410 206
(Owner of Flat no. 305 on 3rd floor)
13. Anant Lahu Gharat
Adult Indian inhabitant having
Address at Post – Vahal, Tal.
Panvel, Dist. Raigad
(Owner of Flat no. 402 on 4th floor)
14.Mrs. Kusumlata Gupta
14a. Arvind Kumar Gupta
Both adult Indian inhabitants,
Having address at 505 Gini Park
CHS, Plot No.26, Sector 16, New
Panvel (East), Navi Mumbai
Pin Code- 410 206
(Owner of Flat no. 403 on 4thfloor)
15. Tapan Kumar Gangopadhyay
15a. Mrs. SrabaniGangopadhyay
Both adult Indian inhabitants,
Having address at PH-02, City
Haven CHS, Plot No.7, Sector 11,
New Panvel (East), Dist. Raigad
Pin Code -410 206
(Owner of Flat no. 404 on 4th floor)
16. Arup Kanti Chanda
16a. Mrs. Sukla Chanda
both adult Indian inhabitants,
having address at Plot No.09,
Road No.04, Sector 12, New Panvel
(East), Navi Mumbai
(Owner of Flat no. 405 on 4th floor)
17. Mrs. Mrudula Nilkanth Dalvi
17a. Mr. Nilkanth Vinayak Dalvi
17b. Ameya Nilkanth Dalvi
All adult Indian inhabitants having
Address at C-31, Torana CHS,
V.K.K. Menon Marg, Sahar,
Andheri (East), Mumbai 400 099
(Owner of Flat no. 501 on 5th floor)
18. DinkarSahadeo Bhagat
18a. Mrs. LubhavanaDinkar Bhagat
both adult Indian inhabitants
having address at 3/35 Shenay
Wadi, Jwahar Nagar, Saibaba Road,
Khar (East), Mumbai 400 081
(Owner of Flat no. 502 on 5thfloor )
19. Anil Balakrishna Shekatkar
Adult Indian inhabitant having
Address at A-1303, Ravechi Heights
Sector 7, Kharghar, Navi Mumbai
Pin Code - 410 210
(Owner of Flat no. 503 on 5thfloor)
20. Mrs. Sipra Pramanik
20a. Mr. Soumyadip Pramanik
Adult Indian inhabitant, having
Address Riddhi Siddhi Residency
Plot No.53 & 53A, Sector 3,
New Panvel (East) 410 206
(Owner of Flat no. 504 on 5th floor)
21.Mr. Parth Goswami
An adult, Indian Inhabitant
Residing at Flat No. 402,
Building no.A-1, Antariksha CHS,
Pimpri –Pune -411 018
(Owner of Flat no. 505 on 5th floor)
22. JeevandharaDharamraj Jain
Adult Indian inhabitant, having
Flat No.303, Gayatri CHS, Plot
No.07, Sector 11, Khanda Colony,
New Panvel (West), Raigad 410 206
(Owner of Flat no. 601 on 6th floor)
23.Mr. Ramchand T. Rochlani
23a.Mrs. Seema Ramchand Rochlani
Both adult Indian inhabitants,
Having their address at A-101
Mitradham Co-op. Hsg. Society,
Jawaaharlal Nehru Road, Opp. Jain
Temple, Sarvodaya Nagar, Mulund
Mumbai -400 080
(Owner of Flat no. 602 on 6th floor)
24.Mrs. Jigna T. Tanna
24a.Jitendra M. Tanna
Both adult Indian inhabitants,
Having their address at A-403
Harmony Tower, Dindayal Marg,
Mulund (West), Mumbai 400 080
(Owner of Flat no. 603 on 6th floor)
25.Ashwin J. Vora
Adult Indian inhabitant residing at
Flat No.308, Suparshav Building,
C.S.P. Co-op. Housing Society, )
Opp. Jain Mandir, Sarvoday Nagar,
Mulund (West), Mumbai 400 080
(Owner of Shop no. 01 on Ground flr.)
26. Mr. Ramchand T. Rochlani
26a. Mrs. Seema Ramchand Rochlani
Both adult Indian inhabitants,
Having their address at A-101
Mitradham Co-op. Hsg. Society,
Jawaharlal Nehru Road, Opp. Jain
Temple, Sarvodaya Nagar, Mulund
Mumbai -400 080
(Owner of Shop no. 02 on Ground flr.)
27.M/s. J.V. Enterprises
A proprietary concern of
Mr. Jayendra V. Gandhi, having its
Address at Flat No.408, Suparsav
Building, C.S.P. Co-op. Housing )
Society, Opp. Jain Mandir,
Sarvoday Nagar, Mulund (West),
Mumbai -400 080
(Owner of Shop no. 04 on Gr.flr.)
28.Raturi Sudhir Totaram
Adult Indian inhabitant, having
Address at Mangium M1, Adhiraj
Gardens, Plot No.32, Sector 5,
Kharghar, Navi Mumbai
(Owner of Shop no. 06 on Ground flr.)
29.DurgaramKhangaraji Choudhary
29a.Mrs. Kamala DurgaramChoudhary
both adult Indian inhabitants,
having their address at Aasharaya,
Plot No.181, Sector 09, New Pavel
(East), Navi Mumbai 410 206
(Owner of Shop no. 07 on Ground flr.)
(Appellants no. 2 to 31a through
C.A Mr. Mehmood Alam Khan
Appellants no.1) ....Appellants
(Original Appellants

VERSUS

1.Sapan Kumar Naskar
Adult Indian inhabitant, Partner of
Defendant No.1, having address at
Xena Villa, Plot No.6, Road No.12,
2.Vijay Somdat Nagpal
Adult Indian inhabitant, Partner of
Defendant No.1, having address at
701 Vikas Classic Housing Society,
Behind Vasant Cinema, Chembur,
Mumbai
3. M/s. S.V. Associates
A partnership firm registered under
The provisions of Indian Partnership
Act, 1932, having its office at
22, Gayneshwari, Plot no.- B- 2B
Sector-12, Kharghar, Navi Mumbai
Pin Code- 410210
4. M/s Sunflower Builders & Developers )
Office no.-177, Sunflower
Sector-09, Ulwe, Navi Mumbai )Respondents

**PAPER NOTICE**

To,
The Respondent no. 1, 3 & 4

This is to inform you that the above-named appellants have filed the Appeal before the Hon'ble BEFORE THE REAL ESTATE APPELLANT AUTHORITY MAHARASHTRA AT KALAGODA MUMBAI vide APPEAL NO. AT006000000053300 against you. The Hon'ble Authority has fixed the hearing of the above captioned appeal on 14/09/2022. You are hereby directed to be remain present on 14/09/2022 in person or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the appeal or who shall be accompanied by some person able to answer all such questions, through online (Video Conference) if you so desire, failing which the Appeal will proceed ex-parte against you.

Date-02/09/2022
Place-CBD

**Sd/-**
**VANDANA**
**Adv. For Appellants**
**Adv. High Court**
**610,6th floor, Prabhat Centre Annex**
**Sector-1A, CBD, Belapur**
**Navi Mumbai-400614**


प्रसिद्ध उद्योजक विलासशेठ कोठारी हे मुरुड येथील उदय सबनिस कुटुंबियांच्या गणरायाचे मनोभावे दर्शन घेताना.


पनवेल येथील उद्योजक संजय दलाल परीवार यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेली श्री गणरायची आकर्षक मुर्ती


पनवेल पालेखुर्द येथील दिलीप भिमाजी महाजन यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराज.


पनवेल येथील विरेंद्रकुमार रतनचंद बांठीया यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराय.


माथेरान येथील कुंदन सुधीर कळंबे यांच्या घरी विराजमान आकर्षक गणेशमूर्ती.


माथेरानमध्ये चर्मकार समाजाचे माजी अध्यक्ष हेमंत हनुमंत पवार यांच्या संत रोहिदास नगर येथील घरी गणेशोत्सव निमित्ताने स्वातंत्र्य दिनाचा अमृतमहोत्सवी देखावा सादर केला आहे.


रोशन विजय गावंड मु. पो. आवरे, ता.उरण, जि.रायगड यांच्या निवास स्थानी विराजमान झालेली गणेश मूर्ती


मोठे भिंगार येथील सौ. विमल दत्तात्रेय पाटील यांच्या घरातील गणेशाची आकर्षक मूर्ती व सजावट


मोठे भिंगार माजी सरपंच अनिल वरे यांच्या घरातील गणेशाची आकर्षक मूर्ती व सजावट


पत्रकार पंकजकुमार पाटील यांच्या पेण-रायगड येथील घरी विराजमान झालेल्या श्री गणरायाची मनमोहक मूर्ती


दिघोडे येथील वर्षकेतू हसुराम ठाकूर यांच्या घरातील गणेशाची आकर्षक मूर्ती व सजावट


रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष श्री.शशिकांत मोरे यांच्या धाटाव येथील निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाचे दर्शन घेताना चिमुरडी मीरा मोरे..


धनगर मलई येथील तुकाराम रायगवळी यांचे निवासस्थानी विराजमान श्रीगणराज.


# किमान वेतनासाठी सिडको, मेट्रोला उपायुक्तांची नोटीस

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई मेट्रो स्थानकात काम कामगारांना सफाई करणाऱ्या ठेकेदाराकडून कमी पगार दिला जात होता. त्यामुळे या कामगारांना किमान वेतन देण्यात यावे, अशी मागणी आझाद कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी सिडको आणि मेट्रोकडे केली होती. त्यानुसार या कामगारांना किमान वेतन देण्यात यावे, अशी नोटीस कामगार उपायुक्त कार्यालयाने बजावली आहे.

नवी मुंबई मेट्रोच्या तळोजा येथील मेट्रोचे कारशेड, मेट्रो रेल्वे, बस स्थानक, कारशेड आदींच्या साफसफाईचे काम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन कंपनीने साफसफाईचे काम शुभा सिस्टम व इक्विटर प्रॉपर्टी मॅनेजर लिमिटेड कंपनीला दिले आहे. सिडकोने नेमलेल्या शक्ती कन्ट्रक्शन कंपनीकडून सफाई कामगारांना नियमानुसार पगार दिला जात होता; परंतु सिडकोकडून मेट्रोचे हस्तांतरण महाराष्ट्र मेट्रोरेल कॉर्पोरेशनकडे झाल्यानंतर शुभा सिस्टम ठेकेदाराला काम देण्यात आले. शुभा सिस्टम या ठेकेदाराने इक्विटर प्रॉपर्टी मॅनेजर या कंपनीला सबकॉन्ट्रैक्ट नेमण्यात आले.

या ठेकेदाराकडून ९३ कामगार नेमण्यात आले असून या कामगारांना किमान वेतन दराच्या नियमानुसार कामगारांच्या हातात १७ हजार ३५३ रुपये पगार देणे आवश्यक आहे. मात्र, डिसेंबरपासून या कामगारांना ५ हजार रुपये कमी दिले जात असल्याची तक्रार करण्यात आली होती.


भिवंडी (वडूनवघर) येथील राजवी विवेक मढवी यांच्या घरी गौरी गणपतीची आकर्षक मूर्तीची प्रतिष्ठापना

# मंडळात जुगार खेळण्यास विरोध केल्याने एका सदस्यांस करण्यात आली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मंडळात जुगार खेळण्यास विरोध केल्याने एका सदस्यांस इतर चार सदस्यांनी शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना पनवेल शहरातील शिवाजी नगर झोपडपट्टी येथे घडली आहे. शिवाजी नगर युवक मित्र मंडळ या गणेशोत्सव मंडळाचे सदस्य असलेले आनंद गुरव (वय २९ ) यांनी जुगारासारखे अनुचित प्रकार मंडळात चालवू नका असे इतर सदस्यांना सांगितल्याने त्याचा राग मनात धरून इतर चार सदस्यांनी त्याला शिवीगाळ करून मारहाण केल्याने याबाबत ची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नविन पनवेल रेल्वे स्थानक परिसरात वाहनांचा अडथळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील मुख्य रस्त्यावर रहदारीच्या मार्गात दुचाकी पार्किंग केल्या जात असल्यामुळे प्रवाशांना ये-जा करण्यात अडचणी निर्माण होत आहे. या रस्त्यांवर लावण्यात आलेली दुचाकी वाहने वाहतूक विभागाकडून तातडीने हटविण्यात यावी अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

नविन पनवेल रेल्वे स्थानकातून दररोज मोठय़ा संख्येने प्रवाशांची मोठी वर्दळ असते, परंतु रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारच्या रस्त्यावरून रेल्वे पुलाकडे जाणाऱ्या रहदारीच्या मार्गात मोठय़ा संख्येने दुचाकी वाहने अस्ताव्यस्त अवस्थेत लावली जात आहेत. त्यामुळे येथील ये-जा करण्याचा मार्ग अरुंद झाला आहे. तसेच या स्थानक परिसरातून बाहेर पडताना प्रवाशांच्या नाकी नऊ येतात. या परिसरात अनधिकृत रिक्षा स्टॅण्ड आणि फेरीवाल्यांनी आपले ठाण मांडून ठेवले आहे. येथील रस्ते फेरीवाल्यांनी व्यापल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्यातून लहान-मोठे वाद नित्याचेच झाले आहेत. रेल्वे स्थानकापासून दीडशे मीटर परिसरात फेरीवाल्यांवर न्यायालयाने निर्बंध घातले आहेत. राष्ट्रीय फेरीवाला धोरणातही रेल्वे स्थानकाचा परिसर मुक्त ठेवण्याच्या स्पष्ट तरतुदी आहेत. तरीही नविन पनवेल रेल्वे स्थानक परिसरात फेरीवाल्यांचा विळखा आहे.

स्थानकाबाहेर रिक्षांसाठी जागा निश्चित असल्या तरी त्यांची घुसखोरी कायम आहे. अनेकदा प्रवाशांच्या पायावरूनही रिक्षांचे चाक जाते. पोलिस, महापालिका आणि रेल्वे प्रशासन या परिसरात दिसत सुध्दा नसल्याचे प्रवाश्यांचे म्हणणे आहे. दुसरीकडे अपुरी प्रकाश व्यवस्था, कचऱ्यांचे डोंगर, अरुंद रस्ते, प्रगतिपथावर असलेली कामे यांचेही प्रवेशद्वारांवर अडथळे आहेत. प्रवाशांना त्रासदायक ठरणाऱ्या या रस्त्यावर कोणाकडूनही कारवाई होत नसल्यामुळे चाकरमानी त्रस्त झाले आहेत.

